ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.IX/March 2012;pp.1-4

Research Paper

सोलापूर जिल्ह्याचा प्राचीन राजकीय इतिहास – एक दृष्टिक्षेप

प्रा.सोमनाथ लिगाडे
इतिहास विभाग
डॉ.जे.पी.नाईक महाविद्यालय,
उत्तूर.ता.आजरा,जि.कोल्हापूर
(महाराष्ट्र) 416220

प्रस्तावना :–

प्राचीन काळापासून राजकीय इतिहास हा अत्यंत लोकप्रिय आहे. त्या काळात राजकीय संस्था व राजकीय घडामोडी हाच इतिहासाचा केंद्रबिंदू होता. याचे मुख्य कारण म्हणजे लोकांना राजकीय स्थित्यंतर व नेतृत्व याची फार मोठी उत्सुकता लागलेली होती. पूर्वीच्या राजकीय इतिहासामध्ये राजा, त्याच्या लढाया, तह, करार यांनाच महत्व होते मात्र अलीकडच्या काळात यात फार मोठा बदल झालेला दिसतो. राजकीय इतिहास हा अधिकृत पुराव्याच्या आधारे लिहिला जातो. देशामध्ये राष्ट्रवाद निर्माण होऊन देशाचे भवितव्य घडविण्याचे सामर्थ्य राजकीय इतिहासामध्ये आहे. त्यामुळे तो अतिशय महत्वाचा आहे. म्हणूनच सोलापूर या जिल्ह्याचा या प्राचीन राजकीय इतिहासाचा थोडक्यात आढावा या लेखात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. राजकीय इतिहास इ.स.पू. 230 पर्यंत पाठीमागे जातो.

सातवाहन :–

सोलापूर जिल्ह्याच्या प्रदेशावर सुरूवातीला इ.स.पू 230 या काळामध्ये सातवाहन घराण्याची राजकी सत्ता होती. भीमा नदीच्या खोयातील म्हणजे कृष्णेच्या उपखोयातील सोलापूर, कोल्हापूर व धाराशिव या दक्षिण महाराष्ट्राच्या प्रदेशाला 'कुंतल' म्हणून ओळखले जात होते. सातवाहन सम्राट स्वतःला 'कुंतलेश' म्हणवून घेत होते.1 सातवाहन काळात चालणारा व्यापार भारताच्या दृष्टीने फायद्याचा होता. या काळात भारताचा रोम सारख्या पाश्चिमात्य देशाबरोबर व्यापारी संबंध होते. सोलापूर जिल्ह्यातील मुढवी, सिध्दापूर वाकाव येथे केलेल्या उत्खन्नात सातवाहनकालीन अवशेष मिळालेले आहेत. प्राप्त अवशेषावरून सातवाहन काळातील एक व्यापारी मार्ग चिपळून वरून क–हाड क–हाड वरून सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातून तेरकडे जात असावा. तसेच दक्षिणापथामधील पैठण ते चित्रदुर्ग हा तिसरा व्यापारी मार्ग (द.उ.) पैठणवरून निघून बीड, उस्मानाबाद जिल्ह्यातून पुढे सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल येथून चित्रदुर्ग (कर्नाटक) ला जात असावा.

सातवाहना नंतर वाकाटकांची दक्षिणेत स्वतंत्र राजकीय सत्ता होती. पण सोलापूर प्रदेशावर वाकाटकांची सत्ता होती याचा पुरातत्वीय पुरावा अजून तरी मिळालेला नाही.

मानपुरचे राश्ट्रकुट :–

वाकाटकांच्या विनाशानंतर अनेक लहान–लहान राजघराणी उदयास आली. त्यानंतर सोलापूर जिल्ह्यावर इ.स.4 शतकापासून ते इ. स. 6 व्या शतकापर्यंत मानपुरच्या राष्ट्रकुटांची राजकीय सत्ता होती. कारण म्हैसूर येथील ताम्रपटात मानपुरचा राष्ट्रकुट राजा अविधेय याने जयदिठ्ठ नावाच्या ब्राम्हणास शंभू महादेवाच्या डोंगराच्या पूर्वेकडील पांडरंगपल्ली गाव दान दिल्याचा उल्लेख मिळतो. 'पांडरंगपल्ली' म्हणजे सध्याचे पंढरपूर होय.2 तसेच या ताम्रपटात मानपुर राष्ट्रकुटांचा संस्थापक राजा मानांक याचा उल्लेख 'कुंतलाधिपती' त्यानंतर सत्तेवर आलेला त्याचा पूत्र देवराज याचा उल्लेख 'कुंतल देशाचा नृपती' असा केला आहे.3 मानपुरच्या राष्ट्रकुटांचे राज्य बदामीच्या चालुक्यांनी खालसा केले.

बदामीचे चालुक्य :–

मानपुरच्या राष्ट्रकुटानंतर सोलापूर जिल्ह्यावर बदामीच्या चालुक्यांची राजकीय सत्ता होती. त्यांनी इ.स. 500 ते इ.स. 757 पर्यंत राज्य केले. बदामीचा चालुक्य राजा दुसरा कीर्तिवर्माचा 'वक्कलेरी ताम्रपट' सोलापूर जिल्ह्यातील भंडारकवठे (ता.द. सोलापूर) या गावाशी संबंधित आहे. चालुक्य दुसरा कीर्तिवर्मा याचा भीमा नदीच्या उत्तर किना–यावर 'भंडार गविठ्ठगे ग्राममधिवसती विजयस्कंधावरे' येथे मुक्काम असताना सुळळीयूर, नगियूर, नंदिवळी ही गावे दान दिल्याचा उल्लेख मिळतो.4 हा राजा हा घराण्यातील शेवटचा राजा होता.

मान्यखेटचे राष्ट्रकुट :–

बदामीच्या चालुक्यनंतर सोलापूर जिल्ह्यावर मान्यखेटचे राष्ट्रकुट यांची राजकीय सत्ता होती. त्यांनी इ.स.758 ते इ. स. 973 पर्यंत राज्य केले. दंतिदुर्गाने बदामी चालुक्याचा शेवटचा राजा दुसरा कीर्तिवर्मा याचा पराभव करून मान्यखेट (मालखेड) येथे राष्ट्रकुंटाची पुन्हा सत्ता प्रस्थापित केली. यांनाच 'मान्यखेटचे राष्ट्रकुट' म्हणतात. दंतिदुर्गानंतर राष्ट्रकुट घराण्यात तिस–या कृष्णा पर्यंत दहा राजे होऊन गेले. त्यांनी राष्ट्रकुटांची धुरा व्यवस्थित सांभाळली. तिस–या कृश्णानंतर खोट्टिग हा सत्तेवर आला. त्याच्या काळात परमार राजा सियक याने इ.स.972 मध्ये मान्यखेट जिंकून उध्वस्त केले. त्यानंतर राष्ट्रकुटांचा शेवटचा राजा दुसरा कर्क (इ.स.972–973) सत्तेवर आला. त्याचा पराभव दुस–या तैलाने करून राष्ट्रकुटांचे राज्य नष्ट केले आणि कल्याण चालुक्यांची सत्ता प्रस्थापित केली.

कल्याणचे चालुक्य :–

मान्यखेट राष्ट्रकुटानंतर इ.स 973 ते इ.स.1163 पर्यंत सोलापूर जिल्ह्यावर कल्याण चालुक्यांची राजकीय सत्ता होती. या भागामध्ये कल्याण चालुक्य राजे, सहावा विक्रमादित्य, तिसरा सोमेश्वर, दुसरा जगदेवमल्ल आणि तिसरा तैल यांचे शिलालेख मिळालेले आहेत. सहावा विक्रमादित्याच्या (इ.स.1073–1127) तीर्थ, भंडारकवठे (ता.द.सोलापूर) मार्डी5 अक्कलकोट6 येथील शिलालेखावरून त्याला पद्मलदेवी पासून विजयादित्य हा पुत्र झाला होता. तसेच त्याला मल्लिकार्जुन हा पराक्रमी युवराज होता. विक्रमादित्य हा जयंतीपुरवरून राज्य करीत असल्याची माहिती मिळते. तिसरा सोमश्वरच्या (इ.स.1127– इ.स.1138) औराद.(ता.द. सोलापूर) येथील शिलालेखावरून सोमेश्वर हा कल्याणवरून राज्य करीत होता तसेच त्याचा मांडलिक कलचुरी दुसरा बिज्जलदेव असून त्याने कोल्हापूरच्या शिलाहार गंडरादित्याचा पराभव केल्याची माहिती मिळते.7

दुसरा जगदेवमल्लच्या करजगी (ता.अक्कलकोट) येथील शिलालेखावरून तो कल्याणवरून राज्य करीत असून त्याचा उल्लेख कुंतलचा राजा असा केला जातो. तिस–या तैलाच्या (इ.स.1151–इ.स.1156) निंबर्गी (ता.द.सोलापूर) येथील शिलालेखावरून त्याचा

Please cite this Article as : *प्रा.सोमनाथ लिगाड ,सोलापूर जिल्ह्याचा प्राचीन राजकीय इतिहास – एक दृष्टिक्षेप* **: Golden Research Thoughts (March ; 2012)**

महामंडलेश्वर दुसरा बिज्जल होता. दुसरा बिज्जल हा मंगळवेढ्यावरून राज्य करीत होता अशा माहिती मिळते. तैलच्या काळात दुस–या बिज्जलाने चालुक्यांचे मांडलिकत्व जुगारून कलचुरीची स्वतंत्र सत्ता स्थापन केली.

मंगळवेढ्याचे कलचुरी :–

कल्याणच्या चालुक्यानंतर इ.स.1156 ते इ.स.1184 पर्यंत सोलापूर जिल्ह्यावर मंगळवेड्याच्या कलचुरींची राजकीय सत्ता होती. कलचुरी हे कल्याण चालुक्यांचे मांडलिक असताना त्यांची राजधानी मंगळवेढा ही होती. पुढे त्यांनी आपली राजधानी कल्याणला हलविली.8 डॉ. फ्लीट यांच्या मते त्रिपुरी कलचुरी घराण्यातील एक शाखा कर्नाटकात आली. त्यांनी राज्यविस्तार करण्यासाठी कुंतलकडे स्थलांतर केले आणि मंगळवेढा येथे आपली राजधानी स्थापना केली.9 सोलापूर जिल्ह्यामध्ये कलचुरी अम्मुगि, दुसरा बिज्जल, सोविदेव, संकमदेव यांचे शिलालेख मिळालेले आहेत.

अम्मुगिचा (इ.स.1067–इ.स.1080) मंद्रुप शिलालेख (इ.स. 1069) व भंडारकवठे शिलालेखावरून (इ.स.1069) तो अणदूर – 300 विभागातील मंगळवेढा येथून राज्य करीत होता. तर निंबर्गी शिलालेखावरून (इ.स.1080) तो इ.स.1080 पर्यंत राज्य करीत होता. हे सिध्द होते.10 दुस–या बिज्जलाच्या (इ.स.1130– इ.स.1168) सोलापूरातील बुधवार पेठेतील शिलालेखावरून त्याने कदंबाच्या हंगल किल्ल्यावर हल्ला करून तो जिंकला.11 त्याला मिळालेल्या विजायामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला. त्यामुळे कुंभारी (ता.द. सोलापूर) येथील शिलालेखात त्याने चालुक्यांचे मांडलिकत्व झुगारून कल्याण येथे कलचुरींची स्वतंत्र सत्ता स्थापन केली होती याचा उल्लेख मिळतो. दुस–या बिज्जलाला वज्रदेव, सोविदेव, मल्लिकार्जून, संकमा, अहवमल्ल आणि सिंघण ही सहा मुले होती.

सोविदेवचे (इ.स.1168–इ.स.1176) शिलालेख कामती खुर्द, शिवनी (ता.मोहोळ), लवंगी (ता.द.सोलापूर) येथे मिळाले असले तरी त्यातून महत्तपूर्ण अशी राजकीय माहिती मिळत नाही. संकमदेवच्या (इ.स.1175–इ.स.1180) हत्तरसंग कुडल येथील शिलालेखात त्याने मंदिरासाठी जमीन दान दिल्याचा उल्लेख मिळतो.12

संकमदेव नंतर बिज्जलचा पुत्र अहमल्ल सत्तेवर (इ.स. 1180–इ.स.1183) आला. त्यानंतर लगेच त्याचा भाऊ सिंघण हा सत्तेवर (इ.स.1183– इ.स.1184) आला. सिंघल हा कलचुरी घराण्याचा शेवटचा राजा होता. त्याच्या काळात कल्याण चालुक्य चौथा सोमेश्वर याने कलचुरीचा पराभव करून सत्ता काबीज केली. मात्र पुढे त्याचा यादव, होयसळ यांच्या समोर निभाव लागला नाही. त्यामुळे कलचुरी आणि चालुक्यांची सत्ता संपुश्टात आली.

षिलाहार :–

चालुक्य आणि कलचुरी नंतर सोलापूर जिल्ह्यावर शिलाहारांची राजकीय सत्ता होती. येथील शिलाहार अक्कलकोटचे शिलाहार म्हणून ओळखले जातात. अक्कलकोटचे शिलाहार घराणे हे कल्याणचे चालुक्य आणि मंगळवेढ्याचे कलचुरी यांचे मांडलिक होते.13 अक्कलकोट येथील जुन्या राजवाड्यात मिळालेल्या महामंडलेश्वर इंदरसाच्या शिलालेखावरून येथील शिलाहार घराणे हे सर्व शिलाहार घराण्यामध्ये प्राचीन होते. या शाखेचा मुळ पुरूश हा सुमारे इ.स.735 मध्ये सत्तेवर होता. पिट्टमचे राज्य कृश्णेचे खोरे आणि कालंजर (बुंदेलखंड) च्या दरम्यान होते.

अक्कलकोटच्या इ.स.1114, इ.स.1122–44 च्या शिलालेखावरून येथील शिलाहार तगरचे आणि विजापूरचे स्वामी होते.14 तसेच शिलाहार इंदरस हा कल्याण चालुक्य सहावा विक्रमादित्याचा मांडलिक असून तो जीमूत वाहनाच्या वंशातील आहे. शिलाहार इंदरस आणि त्याच्या घराण्यातील व्यक्तीने करजगी (ता. अक्कलकोट) येथील देवालयासाठी जमिनी दान दिल्याचा उल्लेख मिळतो. अक्कलकोटच्या शिलाहारावर चामुंडिका देवीचा वरदहस्त होता. इंदरसाचा पुत्र दाकरस यांने मंदिरासाठी दान दिल्याचा उल्लेख मिळतो.15 त्यावरून हत्तरसंग कुडल (ता.द.सोलापूर) येथे प्राप्त शिलालेखातही दाकरसाचा उल्लेख जमिनदान संदर्भात आला असावा.

देवगिरीचे यादव :–

अक्कलकोटच्या शिलाहार घराण्यानंतर सोलापूर जिल्ह्यावर देवगिरीच्या यादवांचा (इ.स.835 इ.स.1318) राजकीय सत्ता होती. सुरूवातीला देवगिरीचे यादव घराणे मान्यखेट राष्ट्रकुटांचे मांडलिक होते. पुढे त्यांनी कल्याण चालुक्यांचे मांडलिकत्व स्विकारले. सोलापूर जिल्ह्यामध्ये यादव पाचवा भिल्लम, पहिला जैतुगी (जैत्रपाल), दुसरा सिंघण, कृष्ण (कंधरदेव), रामदेव, तिसरा सिंघणदेव यांचे शिलालेख मिळालेले आहेत.

पाचव्या भिल्लमाने मंगळवेढ्याच्या कलचुरीला इ.स.1184 ला हुसकावून लावले. तसेच कल्याण चालुक्य चौथा सोमेश्वर याच्या विरूध्द बंड करून यादवांचे स्वातंत्र राज्य घोशित केले. पाचव्या भिल्लमाच्या (इ.स.1185–इ.स.1192) मार्डी (ता.उ.सोलापूर) शिलालेखावरून त्याने इ.स.1184 ला राज्यभिषेक करून घेतला.16 मंद्रुपच्या शिलालेखावरून (इ.स.1187) भिल्लम हा चालुक्यांचे मांडलिकत्व झुगारून देण्याच्या तयारीस आहे. तसेच दुस–या तयारीस आहे. तसेच दुस–या शिलालेखात (इ.स.1191) त्याने चालुक्यांचे मांडलिकत्व पूर्णपणे झुगारून दिल्याचा उल्लेख मिळतो. 17 पहिल्या जैतुगीचा (इ.स.1191–इ.स.1210) इ.स. 12 व्या शतकातील शिलालेख हणमगांवला (ता.द.सोलापूर) मिळालेला असला तरी त्यातून महत्वपूर्ण अशी राजकीय माहिती मिळत नाही.

दुसरा सिंघण (इ.स.1210–इ.स.1247) हा पहिल्या जैतुगीचा मुलगा असून त्याने कोल्हापूरच्या शिलाहारांचा पन्हाळा किल्ला जिंकून शिलाहार राज्य खालसा केले. दुस–या सिंघणाचे शिलालेख हुतगी, मदरे, गुंजेगाव (ता.द.सोलापूर) बी.बी. दारफळ (ता. उ.सोलापूर) मंगरूळ (ता.अक्कलकोट) येथे मिळालेले आहेत.18 मंगरूळ शिलालेखावरून त्याच्या काळात असलेली घोडदळ प्रमुख स्त्री अधिकारी, साहिणी भागलदेवी आणि सर्वाधिकारी पदावर असणारी सिंघणची परमविश्वासी 'भागुबाई' यांचा उल्लेख आला आहे. त्यावरून दुस–या सिंघणाच्या काळात स्त्रीयांना एक लक्षवेधी कर्तबगार स्त्री म्हणून महत्वाचे स्थान असल्याचे लक्षात येते.

कृष्णाच्या (इ.स.1247–इ.स.1261) (कंधरदेव) अक्कलकोट शिलालेखावरून तो द्वारावतीपूर राजधानीतून राज्य करीत असल्याचा उल्लेख मिळतो. कृष्णानंतर त्याचा भाऊ महादेव सत्तेवर (इ.स.1260–इ.स.1271) आला. त्याच्या नंतर रामदेव (इ.स. 1271–इ.स.1312) सत्तेवर आला. रामदेवाच्या काळात यादव सत्तेच्या –हासास प्रारंभ झाला. दिल्ली सुलतानाचा पुतण्या अल्लाउद्दिन खिलजीने रामदेवाचा पराभव केले. वेळापूर येथील शिलालेखात त्यांने वटेश्वर–जोगेश्वर मंदिर बांधल्याचा उल्लेख मिळतो. रामचंद्रानंतर त्याचा मुलगा तिसरा सिंघणदेव सत्तेवर (इ. स.1312–इ.स.1316) आला. त्याच्या नंतर रामदेवाचा जावाई हरपाळदेव याने यादवांचे राज्य टिकविण्यासाठी देवगिरीत उठाव केला. पण दिल्लीचा सुलतान मुबारक खान याचा सेवक खुश्रुखानाने हरपालदेवाचा वध करून इ.स.1318 ला देवगिरीचे यादव साम्राज्य खालसा केले.19 पुढे दिल्लीचा सुलतान महमंद तुघलक याने दक्षिणेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपली राजधानी दिल्लीहून देवगिरीला (दौलताबाद) हलविली.

यादवांची सत्ता गेल्यानंतर दक्षिणेत मुसलमानी राजवट सुरू झाली. त्यात प्रामुख्याने सोलापूर जिल्ह्यावर गुलबर्गाचे बहामनी, विजापूरचे आदिलशाही, अहमदनगरचे निजामशाही आणि दिल्लीचे मोगल यांची सत्ता होती. या राजघराण्याचे शिलालेख सोलापूर व आसपासच्या परिसरात मिळालेले आहेत. थोडक्यात सोलापूर जिल्ह्याच्या प्रदेशावर सातवाहन, बदामीचे चालुक्य, मान्यखेटचे राष्ट्रकुट, कल्याणचे चालुक्य, मंगळवेढ्याचे कलचुरी, अक्कलकोटचे शिलाहार व देवगिरीचे यादव यांची सत्ता होती असे म्हणता येते.

Please cite this Article as : *प्रा.सोमनाथ लिगाड ,सोलापूर जिल्ह्याचा प्राचीन राजकीय इतिहास – एक दृष्टिक्षेप* **: Golden Research Thoughts (March ; 2012)**

संदर्भ

1. मोरवंचीकर, रा.श्री, सातवाहन कालीन महाराष्ट्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे 1993, पृ.क्र. 52
2. भावे, वा.कृ.,मुसलमानपूर्व महाराष्ट्र, भाग ' 2, पुणे, 1947, पृ.क्र8.
3. देव,शां.भा.,महाराष्ट्र व गोवे शिलालेख – ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भसूची, महाराष्ट्र राज्य मुंबई,1984, पृ.क्र.242
4. देशपांडे, प्र.न., संपादक, 'संशोधक' इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळाचे त्रैमासिक, धुळे, मार्च 2004,पृ.क्र.18.
5. Ritti, Shrinivas and Kumbhar, Anand; Inscriptions from Solapur Distirct, Shrihari Prakashana, Karnataka University, Dharwad, 1988, Page No. 143 to 147.
6. उपरोक्त, देव, शां.भा.,पृ.क्र.1,4.
7. उपरोक्त, रित्ती, श्री,निवास कुंभार, आनंद, पृ.क्र. 148.
8. उपरोक्त, देशपांडे प्र.नं,पृ.क्र 14.
9. Gopal, B.R., Minor Dynastias of South India, Karnataka, Vol.-I, New Era Publication Madrash, 1982, Page No. 344.
10. उपरोक्त, रिक्ती श्रीनिवास, कुंभार, आनंद, पृ.क्र.150–152.
11. कित्ता, पृ.क्र.149
12. उपरोक्त, देव.शां.भा.,पृ.क्र. 110,111.
13. उपरोक्त, गोपाल, बी.आर.,पृ.क्र. 151.
14. उपरोक्त, देव शां.भा., पृ.क्र. 1.4.
15. कित्ता,पृ.क्र.4
16. पानसे,मु.ग.,यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन मुंबई, 1963, पृ.क्र.27.
17. उपरोक्त, देशपांडे,प्र.न.,पृ.क्र. 23
18. उपरोक्त, रित्ती,श्रीनिवास, कुंभार आनंद, पृ.क्र. 160.
19. उपरोक्त,पानसे, मु.ग.,पृ.क्र 37,38.

Please cite this Article as : *प्रा.सोमनाथ लिगाड ,सोलापूर जिल्ह्याचा प्राचीन राजकीय इतिहास – एक दृष्टिक्षेप* **: Golden Research Thoughts (March ; 2012)**